ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

**Dr. V. N. Bhosale**
Pricipal, Shivaji Arts, Commerce and
Science College, Kannad.

**Dr. B. K. Magar**
Vice Principal, Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. V. D. Kasture**
Associate Professor, Department of Psychology,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. P. B. Ahire**
Professor, Department of Sociology,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. R. K. Pawar**
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. K. L. Bhanuse**
Assistant Professor, Department of History,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. S. K. Bhalerao**
Associate Professor, Department
of Public Administration,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. J. V. Bhelonde**
Associate Professor, Department of History,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. S. A. Gorde**
Assistant Professor Department of Economics,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. R. M. Ghoti**
Assistant Professor Department of Psychology,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. S. V. Kashid**
Assistant Professor Department of
Public Administration,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. B. G. Deshmukh**
Assistant Professor, Department. of History,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Dr. P. B. Mahajan**
Assistant Professor, Department of History,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

**Shri. S. K. Mogal**
Assistant Professor, Department of Sociology,
Shivaji Arts, Commerce
and Science College, Kannad.

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | महिला सबलीकरणात महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका<br>**डॉ. नानासाहेब भाऊसाहेब दाभाडे** | १३५-१४ |
| २८ | महिलांच्या सक्षमीकरणामध्ये बचत गटांची भूमिका<br>**प्रा. डॉ. सौ. रागिणी पाध्ये** | १४२-१४ |
| २९ | स्त्री व समाज<br>**प्रा. डॉ. अनिल डी. पवार** | १४५-१४ |
| ३० | महिला सक्षमीकरण बचत गटाची भुमिका<br>**डॉ. जयश्री आसाराम तळेकर** | १४९-१५ |
| ३१ | भारतीय संविधान आणि महिला सबलीकरण : एक प्रशासकीय अभ्यास<br>**डॉ. संजय किशनराव भालेराव** | १५२-१५ |
| ३२ | शोषणमुक्ती आणि सर्वांगिण विकासासाठी स्त्रीयांचे मानसिक सक्षमीकरण<br>**स्टिफन इग्नेशिआस आल्मेडा** | १५७-१६ |
| ३३ | स्त्री-पुरूष शारिरिक आणि सांस्कृतिक लिंगभेद व त्यांचे परिणाम अभ्यासणे<br>**डॉ. जाधव रामदास काळू** | १६५-१६ |
| ३४ | इतिहासातील दुर्लक्षित महिला "आशाताई आनंदराव वाघमारे"<br>**प्रा. डॉ. कालिदास दिनकर फड** | १६९-१७ |
| ३५ | भारतातील स्त्रीया आणि राजकारण<br>**कु. कोमल जादुगर बनकर** | १७१-१७ |

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com) CC-2

# २९. स्त्री व समाज

प्रा. डॉ. अनिल डी. पवार
म.स.गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प नाशिक.

भारतातील विविध चळवळींसोबतच सामाजिक-राजकीय क्षितिजावर महिलांनी पुढाकार घेत फेरबदल केल्याची उदाहरणे आपणास दिसून येतात. शिक्षण, प्रबोधन, आंदोलन, सामाजिक परिवर्तन, राजकीय निर्णय निश्चिती अशा विविध क्षेत्रांमध्ये महिलांची कामगिरी चित्तवेधक स्वरुपाची आहे. उदा. भारताच्या पहिल्या पंतप्रधान इंदिरा गांधी, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, नोबेल परितोषिक विजेत्या मदर तेरेसा, महिला पोलीस अधिकारी किरण बेदी, अंतराळवीर कल्पना चावला, सर्वोच्च न्यायाधीशपदी मिरासाहेब फातिम बीबी यांची नियुक्ती करण्यात आल्याची उदाहरणे आहेत. तसेच एकेकाळी राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई कानडे, जनक्का शिंदे, गोदावरी परुळेकर, पी.टी. उषा यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटविलेला आहे. महिलांच्या कर्तृत्वाला सलाम.

ज्याला स्त्री 'आई' म्हणून कळाली तो जिजाऊचा शिवबा झाला.
ज्याला स्त्री 'बहिण' म्हणून कळाली तो मुक्ताईचा ज्ञानदेव झाला.
ज्याला स्त्री 'मैत्रीण' म्हणून कळाली तो राधेचा शाम झाला.
आणि ज्याला स्त्री 'पत्नी' म्हणून कळाली तो सीतेचा राम झाला.
प्रत्येक महान व्यक्तीच्या जीवनात आणि यशात स्त्रीयांचा सिंहाचा वाटा आहे.

स्त्री ही समाजातील एक महत्त्वाचा घटक आहे. स्त्री आणि पुरुष ही संसाररुपी रथाची दोन चाके असून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मात्र समाजात पुरुषाला प्रथम तर स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले जाते. स्त्री आहे जननी, निसर्गाला सृजणशील बनवणारी, या जगाला क्षमा शांतीचा मुलमंत्र देणारी, भविष्याला आपल्या ओटीत आणि गतकाळाला फुलविणारी स्त्री विधात्याने निर्माण केली आहे. हीच स्त्री एका चौकटीत राहून जगायला लागली म्हणून नियतीने तिला वेगळ्याच दावणीला बांधले आहे.

पिता रक्षति कोमार्ये, भ्रांता रक्षति यौवन, रक्षन्ती स्थाविरे पुत्र, न स्त्री स्वातंत्र्यम् पुत्र,
न स्त्री स्वातंत्र्यम् अहर्ती.

एकीकडे पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून सर्वत्र क्षेत्रात उत्तुंग अशी भरारी स्त्रीने घेतलेली असली तरी आजही समाज तिच्याकडे अबला म्हणून पहात आहे.

स्त्रीला जन्मतःच स्त्री म्हणून मिळालेले नैसर्गिक स्थान हेच तिला मिळणा-या अन्यायकारक वागणुकीला पुरक समजले जाते. स्त्रीयांचा जन्म म्हणजेच अनेक समस्यांचे माहेरघर होय. मुलीला जन्मापासुन मृत्यूपर्यंत तिला अनेक समस्यांमधून जावे लागते. निसर्गाने मातृत्वाची जबाबदारी स्त्रीवर टाकलेली असून मासीक पाळी, गरोदरपण, बाळंतपण, स्तनपान आणि बालसंगोपन यामुळे भोगाव्या लागणा-या यातनांमुळे स्त्री दुबळी, हळवी, चिडखोर व त्रासिक बनली. असमाधानी आणि मर्यादित आशा-आकांक्षावर जगणा-या स्त्रीयांच्या वैच्यारीक पातळीत संकुचीतता आली. त्यातून स्त्रीया एकमेकींचा द्वेष करते उदा. सासू-सुनेचा वाद निर्माण होतो.

स्त्रीयांना सामाजिकदृष्टया अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते अशा काही समस्या पुढीलप्रमाणे.......

१. सामाजिक रूढी परंपरा:- मुलगी जन्माला आल्यानंतर ती कुटुंबाचा आधार न वाटता सामाजिकदृष्ट्या भार वाटू लागते. यामध्ये काचेचे भांडे, परक्याचे धन, जीव घेणी हुंडा पध्दत, सर्व सोपस्कार पार पाडूनही सासरची मंडळी चांगली असेलच असे नाही.

२. हुंडा पद्धती :- हुंडा पद्धती ही समाजाला लागलेली कीड आहे. शिक्षणाचा प्रसार वाढल्यावर ही प्रथा बंद होईल अशी अपेक्षा होती. मात्र जितके जास्त शिक्षण तेवढा जास्त हुंडा अशी पद्धत रूढ झाल्याने, हुंडा घेणे-देणे प्रथा प्रतिष्ठेचा भाग झाल्याने दोघही पार्ट्या खुशीने तयार होतात.

विवाहाबाबतच्या घटनांना बाजारी स्वरूप प्राप्त झाले असून मुलीचा जन्म हा कुटुंबाला 'शाप' वाटायला लागला आहे. हुंडा पद्धत ही सती पद्धती पेक्षा जास्त भयावह व दुखःद आहे.

३. आत्महत्या:- मानवाचा जन्म एकदाच होत असून प्रत्येकाला आपला जीव प्रिय असून हा भारत एकमेव असा देश आहे की ज्यात विवाहित स्त्रीया कौटुबिक कारणांना कंटाळून शेवटी आत्महत्या करतात. यातही १५ ते ३४ वयोगटातील स्त्रीयांचेच प्रमाण आधेक असल्याचे निदर्शनास येते.

४. कुमारी माता :- माता होण्याचा कायदेशीर अधिकार सामाजिकदृष्टीने विवाहित स्त्रीलाच आहे. मात्र शारीरिक विकास होण्याआधी किंवा विवाह न होता जी स्त्री बाळाला जन्म देते तिला कुमारी माता म्हणतात. अशी माता म्हणजे कुटुंब व समाजाला कलंक मानला जातो. सद्या मात्र तरुण तरुणींना मिळणारे नको तेवढे स्वातंत्र, शारीरिक आकर्षण, इंटरनेट सारख्या सुविधांमुळे गर्भधारणा होऊन मुली

कुमारी माता होतात. अशा मुलींनी जन्माला घातलेल्या अपत्याचे संगोपन करतांना खूप यातना भोगाव्या लागतात.

५. वेश्या व्यवसाय:- वेश्याव्यवसाय हा प्रामुख्याने पैसे मिळविण्याच्या उद्देशाने केला जातो. वेश्या आपले शरीर दुस-याला उपभोगण्यासाठी देत त्या मोबदल्यात पैसे, कपडे आणि वस्तू घेतात. वेश्याव्यवसाय हा स्त्री पुरुषांनी चालविलेला सयुंक्त धंदा आहे. समाजाने मान्यता दिलेली नसली तरी पैसे आणि अनैतिक लैगिंक व्यवहारासंबधी असतो. काही वेळा दारिद्र्य, फूस लावून, फसवणुकीतून, अधिक लैगिंक सुख मिळविण्यासाठी असा व्यवसाय केला जातो.

अन्याय-अत्याचार:- कुटुंबात मुलीचा जन्म म्हणजे बोझा, नसती आफत, काचेचे भांडे यासारख्या कारणामुळे अशा 'नकुसा' वर अन्याय अत्याचार केला जातो. यामध्ये मुलीच्या आईला छळले जाते, मुलीला दुध न पाजणे, वैद्यकीय उपचार न करणे या अशा पद्धती काही वेळा वापरल्या जातात

७. हिंसा, छळ व लैंगिक शोषण:- स्त्री म्हणजे उपभोग्य वस्तू, पुरुषाची दासी यासारख्या विचारसरणीमुळे लैंगिक छळ, अश्लील बोलणे, वागणे, ब्ल्यू फिल्म दाखविणे, मारझोड करणे, डाग देणे, अंगावर गरम तेल ओतणे, टाचण्या टोचणे, सतत दडपणाखाली ठेवणे यासारखे स्त्रीयांवर अत्याचार होतात. तसेच घरातील अशा गोष्टी बाहेर बोलू नकोस अशी शिकवण आई वडील मुलीला देतात व ते सहन करणे जणू आपले कर्त्यव्यच आहे. म्हणून मुली निमुटपणे अन्याय सहन करतात. या व अशा अनेक कारणांमुळे 'नसती आफत' म्हणून मुलींचा गर्भपात केला जातो.

प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की स्त्रीची समस्या ही 'एका स्त्रीची समस्या नसून संपूर्ण समाजाची समस्या' आहे. याचे भान सर्वांनी ठेवणे गरजेचे आहे. महिलांच्या दुरावस्थेचे दूरगामी परिणाम समाज आणि संस्कृतीच्या अध:पतनामुळे पहावयास मिळतात. उलट स्त्रीची उन्नती समाजाच्या विकासाचे कारण बनू शकते. याकामी पुरुषांचा पुढाकार खूप गरजेचा आहे.

स्त्रीयांमध्ये शारीरिक व मानसिक शक्ती विकसित करण्यासाठी ..........

१. शिक्षण:- 'शिक्षणामुळे जग कळते' असे म्हणतात. समाजाच्या उद्धारातून आपणास त्याची जाणीव झाली आहे. स्रीयांच्या स्वावलंबन आणि सक्षमीकरणासाठी शिक्षण गरजेचे असून ग्रामीण भागात तेवढ्या सुविधा उपलब्ध नसल्याने मुलींना बाहेरगावी पाठवणे पालकांना मान्य नसल्याने आजही अनेक मुली

अर्धवट शिक्षण घेतात. सहाजिकच कमी वयात विवाह केली जात असल्याने काही अडचणी उद्भवल्यास स्वतःच्या पायावर उभे राहणे अशक्य होते. तसेच महत्वाच्या निर्णयात सहभागी होता येत नाही.

२. कायदा:- ज्या देशात लोकशाही सोबत कायद्याचे राज्ये आहे. अशा देशात रोजच्या जीवनात उपोयोगी पडतील असे अनेक कायदे आहेत. ज्याबाबत स्त्रीयांनी सजग होणे आवश्यक आहे. उदा. १९८६ नुसार व्यक्ती हुंडा देते किंवा घेते किंवा देण्या-घेण्यास भाग पाडते. अशा व्यक्तीस सहा महिने तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा केल्या जातात. अशा अनेक गोष्टी आहेत पण नको ती कोर्टाची पायरी म्हणून न्यायिक असले तरी अनेक गोष्टी मुकाट्याने सहन केल्या जातात.

शेवटी हेही तितकेच महत्वाचे आहे की, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ज्याप्रमाणे सर्व जीवजातींची गरज आहे. त्याचप्रमाणे स्त्री-पुरुष प्रमाण सारखे व त्यांच्यात समानता असणे काळाची गरज आहे. म्हणून शासन, कायदे यापेक्षा समाजानेच पुढाकार घेणे आवश्यक आहे अन्यथा....

संदर्भ ग्रंथ

१. भारतीय समाजातील स्त्रीयांचे समाजातील स्थान- शरयु जोशी, उमा बेडसे

२. महाराष्ट्र टाईम्स लेख, १८ फेब्रुवारी १९९८

३. समतेसाठी स्त्रीयांचा संघर्ष- डॉ. निलम गो-हे

४. स्त्रीया आणि कायदा- डॉ. निलम गो-हे

५. भारतातील सामाजिक समस्या- डॉ. सुधा काळजाते

६. महिलांवरील अत्याचाराचा अंत कुठे? दैनिक लोकमत, ३० ऑगस्ट १९९८, प्रा. रामानंद व्यवहारे

७. कामाच्या ठिकाणी महिलांचे शोषण, गृहशोभिका लेख, जुलै १९९४

८. महिलांचे कायदे, दैनिक पुढारी, २०१७

९. महिलांवरील अत्याचार, दैनिक भास्कर २०२१